देव कन्या पुष्प ५ वें....

# आईचा-आशीर्वाद

.... उपेक्षित मातृभक्ताचे काव्यमय चरित्र ....

म. ग्र. सं. ठाणे
वि चरित्र
सं. क्र. १२८८

-:लेखक:-
श्री. रा. देव
धाराशिव

REFBK-0010324

-प्रस्तावना-
प्रा. जी. टी. क्षीरसागर

किमत ७५ नये पैसे

देव कन्या पुष्प ५ वें ....

चारित्र

# आईच्या-आशीर्वाद

.... उपेक्षित मातृभक्ताचे काव्यमय चरित्र ....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५९९७ वि: चरित्र
क्रमांक नों दि:

-लेखक-
श्री. रा. देव
धाराशिव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 90328

-प्रस्तावना-
डॉ. जी. टी. क्षीरसागर

REFBK-0010324



प. बनसीधर विठ्ठलप्रसाद तिवारी, वकील

निरीक्षक आर्यसमाज, धारूर ( केज )

....मा तृ भ क्त....

—यां नी—

या प्रकाशनासाठीं २०१ रुपये देणगी दिली

## ....श्री. देवांची प्रकाशनें....

| | मूल्य रु. नये पैसे |
|---|---|
| देवकन्या पुष्प १ ले ( शिल्लक नाही ) | १--२५ |
| श्री. संत भटजीबापू (चरित्र) पुष्प २ रें | ०--७५ |
| प्रतिज्ञा पूर्ति ( खंड काव्य ) पुष्प ३ रे | १--२५ |
| विचार लहरी (लेख संग्रह) पुष्प ४ थें | २--०० |
| आईचा आशीर्वाद पुष्प ५ वे | ०--७५ |

## ....आगामी प्रकाशनें....

★ तेजस्वी तारे

★ भाव तरंग

★ माधव गुणगान

★ बुद्धदर्शन ( २ भागांत )

★ विचार धारा ( लेखसंग्रह )

## मिळण्याची ठिकाणें:—

श्री. श्री. रा. देव, 'देवनिवास' धाराशिव, उस्मानाबाद.

हिंदुस्थान साहित्य, ३०९ मोतीबाग, शनिवार पेठ, पुणें २.

: मुद्रक :

**व. वि. आपटे,** बी. कॉम्.

हिंदुस्थान मुद्रणालय, ८६५ सदाशिव पेठ,

पुणें २.

★

मार्गशीर्ष कृष्ण ११ शके १८८१

दि. २६-१२-१९५९

सर्व हक्क लेखकाधिन

★

: प्रकाशक :

**श्री. रा. देव**

'देवनिवास' धाराशिव

उस्मानाबाद

देव कन्या पुष्प ५ वें ....

# आईच्या-आशीर्वाद

.... उपेक्षित मातृभक्ताचे काव्यमय चरित्र ....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५८७९ वि: चरित्र
क्रमांक ३५ नों. दि:

लेखक:-
श्री. रा. देव
धाराशिव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १०३२८

-प्रस्तावना-
डॉ. जी. टी. क्षीरसागर

REFBK-0010324

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ......................

# अर्पण पत्रिका

( पृथ्वी )

' शतायु भव ' बनासि हा सतत माय दे आशिला
अशा शुभ वचास मी करीत देवही साथिला
घडो नित करीं तुझ्या सतत पुण्यदायी कृती
समर्पण करी पदीं जननि देवही सत्कृती

धाराशिव
दि. २६-१२-१९५९

श्री. रा. देव

# प्र स्ता व ना

## (ले. डॉ. जी. टी. क्षीरसागर)

'आई' हा शब्द कानी पडताच एक प्रकारची पूज्य भावना व चैतन्य प्राप्त होतें, इतकी जादू 'आई' या शब्दांत भरलेली आहे; नाहीतर 'जननी जन्मभूमिश्चस्वर्गादपि गरीयसी,' किंवा 'न मातुः परदैवतम्' यासारखीं त्रिकालाबाधित गोड सुभाषितें जन्मालाच आली नसती. राजकवि यशवंत यांनीं 'आई' ही एकच कविता लिहिली असती तरी ते कवि म्हणून गाजलेच असते. हांसत हांसत सुळावर चढून प्राण देणारे, वीर हुतात्मे 'आई' या एकाच शब्दानें भारून जाऊन, आपलें प्राणसर्वस्व मातेपायीं देऊन धन्यता मानतात. माता पितरांची सेवा हेंच सर्वस्व मानणारा पुंडलिक 'या विटेवर जरा वेळ उभा रहा' अशी परमात्मा विठ्ठलास आज्ञा करूं शकतो, व भागवत् धर्माचें पुण्य पावन केंद्रस्थान पंढरी निर्माण होऊं शकते

हिंदुसाम्राज संस्थापक श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांना आईच्या आशीर्वादानेंच हिंदुसाम्राज्य स्थापन करतां आले. स्वातंत्र्यवीर सावरकर आईला दास्यपंकांतून काढावें,व तिला सुखी करून डोळ्यानी आपण तिचें सुख पहावें याच एका पवित्रतम हेतुने आजन्म कष्टमय जीवन व्यतीत करतात व 'आईच्या आशीर्वादानेंच' ते मरणप्राय सकटांनाहि तोंड देऊन आज भारतांत सुपुत्र म्हणवून घेतात. ही सर्व आईच्या आशिर्वादाचींच फळें होत. अशा निष्कपट व प्रेमळ आईचा आशीर्वाद वाटेल तें दिव्य करूं शकतो हें आजपर्यंत स्वतः सिद्धच आहे.

उस्मानाबादेचे (मराठवाड्यांतील) सुप्रसिद्ध कवि व लेखक श्री. श्री. रा. देव यांनीं लिहिलेल्या (पांचव्या काव्यसंग्रहास) 'आईचा आशीर्वाद'

हे गोड व समर्पक नांव देऊन त्यांनीं आंतील चरित्रावरहि सुंदर प्रकाश टाकला आहे.

'धारुरच्या' एका उपेक्षित मातृभक्ताचें काव्यचरित्र लिहून श्री. देवांनी एका थोर मातृभक्ताला प्रकाशांत आणून मोठी भरीव कामगिरी केली आहे,' असें मोठ्या स्वाभिमानानें मी म्हणेन. चरित्रनायक श्री. बनसीधर विठ्ठलप्रसाद तिवारी आईच्या आशीर्वादानें वेळोवेळीं संकटमुक्त कसा होतो, हे देवांनीं त्याच्या आयुष्यांतील निरनिराळ्या प्रसंगांनीं दाखविलें आहे. व्रतबंधाचे वेळीं घरास (मत्सर ग्रस्तांनीं) आग लावणे, सांतूतून विष देणे मारेकरी पाठविणें इत्यादि दुर्धर प्रसंगांतून चरित्रनायक कसें बचावलें याचें हृदयंगम चित्र देवांनीं, आपल्या प्रासादिक काव्यातून सुंदरपणें रंगविलें आहे; व 'तारी ज्यासी देव तयासी कोण जगीं मारी?' हें सुभाषित आपल्या गोड काव्यांत कौशल्यानें गोंविलें आहे. स्वतः चरित्रनायक प्रापचिक व्यथेनें व आपल्या आईच्या जर्जर शरीराच्या दुर्दशेचें चित्र पाहून वैतागानें आत्महत्या करण्याचें अनेक प्रयत्न करतो, पण केवळ आईच्या आशीर्वादानें त्याला त्यांत अपयश येतें. त्यांचे पूज्य मामा पं. कुंजनप्रसाद आपल्या भाचास (बनसीधर) आत्महत्या करणें हें पाप आहे, आईबरोबर तूंहि प्राण देणें हें असमंजसपणाचें आहे. तूं ज्या आईवर इतके प्रेम करतोस तिचे एकादे संस्मरणीय स्मारक उभारल्यास तूं धन्य होशील व अंशतः मातृऋणांतून मुक्त होशील हें सांगतांना आईच्या सामर्थ्याचें श्री देवांनी केलेलें वर्णन किती योग्य आहे तें पहा.

'काका मामा नि बंधू, इतर जन तसे, सर्व साथी सुखाचें
येतां वेळा कठीणा, कुणी, न पुसतसे, पांगती आप्त साचें
निष्काम प्रेम जीचें वघुनि जगति ये, न्यूनताही, पित्याला
आईचा शीर्षि ज्याच्या अभयकर सदा, कांपतो काळ त्याला ॥

या वेळी 'पिता जरि विटे, विटो न जननी, कुपुत्री विटे
म्हणूनि म्हणती भलें न ऋण, जन्मदेचें फिटे ॥

या मोरोपंतांच्या केकांची आठवण होते. त्याचप्रमाणें मामांच्या
'नाशवंत हा देह सदाचा " शाश्वत आत्मा तो नित्याचा'
देहपात तो होता अमुचा । उडुनि राघू आत्मा जाईल ॥

म्हणून तूं 'अमर राहणारें एकादें सत्कृत्य आईच्या नांवानें केल्यास धन्य होशील;' हे वर्णन श्री. देवांनीं अनेक उदाहरणें देऊन काव्यांत ओज प्रसाद व माधुर्य निर्माण केले आहे.

जीवनानुभूतींतून काव्य जन्मल्यास तें परिणामकारक होते व त्यांत जिवंतपणा येतो ह्याचें प्रत्यंतर देवांच्या काव्यांत अनेक ठिकाणीं दिसतें.

त्याचप्रमाणें चरित्रनायक वनसीधर प्रसाद यांच्यात असलेला प्रामाणिकपणा, ईश्वर परायणता निस्पृहता, कर्तव्यतत्परता, स्पष्टता, धैर्य इत्यादि गुणांचाहि उल्लेख सोदाहरण देवांनीं केला आहे. शेवटचा अभंग 'मागणें' सरस उतरला आहे, व त्यांत किती अंतःकरणाची तळमम व्यक्त केली आहे ती पहा.

घडो संत सेवा नित्य मम हातीं । अशुभ न येवो कदा ममचित्तीं
काया ही पडावी संतांच्या चरणीं ॥ जग सुखी ठेवी विनंति ही चरणीं
निरामय होवो भारत हा देश । सस्यमय शोभे जगतात
आईच्या चरणीं पडो हे मस्तक ॥ देव दया होवो याचना ही

इतकें गोड मागणें मागून श्री. देवांनीं "आईचा आशीर्वाद" हे सुंदर व हृदयस्पर्शी काव्य संपविलें शाहे.

श्री. देवांचें हें काव्य लहान असलें तरी त्यांत प्रसाद, माधुर्य व ओज असून सात्विकता आहे, त्यांत दिव्य चेतना आहे हृदयाची तळमळ आहे. व हृदयाला पटतील अशी अनेक गोड व रम्य स्थळें आहेत.

'आईचा आशीर्वाद' हा देवांचा ५ वा काव्संग्रह त्यांच्या मागील काव्याप्रमाणें रसिकांच्या आदरास पात्र होईल यांत शंका नाहीं. एका उपेक्षित मातृभक्ताचे चरित्र लिहून त्यास प्रकाशांत आणल्याबद्दल देवाचें कोणीही मातृभक्त व रसिक कौतुकच करील.

श्री. देवांची अप्रकाशित काव्यपुष्पें लवकरच विकसित होवोत, ही देवाच्या चरणी माझी सदिच्छा व्यक्त करून ही लांबवलेली प्रस्तावना येथें पूर्ण करतो.

------

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...................... वि: .................. ...
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# — कृ त ज्ञ ता —

माझे परमप्रिय मित्र, मराठवाड्यांतील धाराशीव् येथील सुप्रसिद्ध कवि, श्री. श्रीधरराव देव, यांनीं स्वयंस्फूर्तीने " आईचा आशीर्वाद " हा काव्यसंग्रह लिहून आमच्या घराण्याबद्दल जें प्रेम व्यक्त केले, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

माझ्या हातून माझ्या प्रेमळ मातापितरांचे स्मरणार्थ जें अल्प स्मारक परमेश्वर कृपेनें उभारलें गेलें, त्याविषयी श्री. देवांना माझ्या पेक्षांहि जास्त आनंद व आत्मीयता वाटली हें त्यांनीं केलेल्या काव्यसंग्रहांतील सरस सुबोध, ओजस्वी व प्रासादिक वर्णनावरून स्पष्ट होते.

अभिजात कवि कसा असतो, हे श्री. देवांच्या या काव्यगुणावरून कोणासही सहज कळण्यासारखे आहे. कोणताही विषय कसा रंगवावा, व तो ही औचित्यपूर्ण शद्वांत, ही कला श्री. देवांना चांगली अवगत आहे. त्यांचें हें ५ वें पुष्प पूर्ण विकसित स्वरुपांत वाचकांच्या हातीं पडत आहे.

मी निमित्त मात्र आहे. या काव्यसंग्रहांचे सर्व श्रेय व श्रम श्री देवांचेंच आहे. हे वेगळे सांगणें नको

श्री. देवांच्या या श्रमाचें योग्य कौतुक रसिक करतील यांत शंका नाही त्यांची पहिली चारी पुष्पें एकापेक्षां एक सरस व उत्कृष्ट वठलीं आहेत, हें त्यांवरील विद्वान रसिक श्री. लोकनायक मा. श्री. अणे, डॉ. शं. दा. पेंडसे कवि यशवंत, श्री. मु. मा. घाणेकर, यांच्या अभिप्रायावरून सिद्धच झालें आहे. त्यांचे काव्यसंग्रहाचा खपहि दांडगा असून अल्पावधींत ४ पुष्पें बाहेर पडली व रसिकांच्या आदरास पात्र झाली यावरूनच कळते.

श्री. देवांचें पुनः एकदां आभार मानून कृतज्ञतापूर्वक मी हें दोन शद्व येथेंच संपवितो.

**बनसीधर विठ्ठलप्रसाद तिवारी**

धारूर, ( केज )

# लेखकाचें निवेदन

जगांत अमोल रत्नाचें, संधि मिळाल्यास, तेज प्रगट होतें. पण कांहीं अमोल रत्नें सागराच्या आंत दडपलीं गेल्यामुळें, तीं सतेज असूनहि अंधारांतच राहतात. ज्यांची ज्यांची म्हणून आत्मचरित्रें, आठवणी किंवा व्यक्तिचित्रें बाहेर आली, ती अमोल चरित्रें संधि मिळाल्यामुळें, किंवा कांहींहि कर्तव्य न करतां केवळ जन्मकालीच्या शुभग्रहामुळें, प्रकाशांत आली. बाकीचीं उपेक्षित राहिल्यामुळें, किंवा लहानशा अप्रसिद्ध गांवी जन्मभर राहिल्यामुळें जगाला अज्ञात राहिली.

पण त्यामुळें त्यांचें तेज मात्र यत्किंचित्‌हि कमी न होता जास्तच वाढतें.

अशाच एक उपेक्षित मातृभक्ताचें काव्यमय चरित्र, ज्यास मी "आईचा आशीर्वाद" हें नांव दिले आहे, देवकृपेनें, प्रसिद्ध करण्याचें सद्भाग्य मला लाभले, हे मी माझे सद्भाग्यच समजतो. कांहीं कामानिमित्त मी वारुरला गेलो होतो.

मी तेथें गेल्यावर माझा मुक्काम १५ दिवस पडला. त्या अवधींत माझीं कांहीं कीर्तनें, व काव्यगायनाचें कार्यक्रम झालें. त्याच गांवचे 'आईचा आशीर्वाद' या काव्यपुष्पाचें नायक प्रसिद्ध आर्यसमाजी पंडित बनसीधर विठ्ठलप्रसाद तिवारी यांची भेट झाली.

बोलतां बोलतां ते मला म्हणाले "मी माझ्या प्रेमळ आईच्या स्मरणार्थ एक धर्मशाळा, अेक विहीर व जवळच एक आंबराई लावून, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांस छाया, पाणी, व राहण्यास धर्मशाळा बांधली आहे आपण पहाण्यास चलता का?"

या मातृभक्ताने आईच्या स्मरणार्थ इतकें पुण्यकर्म करून मला ज्या अर्थी पहाण्यास बोलविलें, तेव्हां तें पाहण्यास येण्याचें मी आनंदानें कबूल केले व दुसरे दिवशीं आम्ही दोघे घोड्यावर बसून तें स्थळ पहाण्यास निघालो.

उन्हाळ्याचे दिवस होते. घोड्यावर उन्हातून गेल्यामुळें मला फार थकवा आला, तहान लागली. व कशाला या गृहस्थावरोबर आलो? असें वाटले.

पण त्या ठिकाणीं जातांच काय सांगावें? मला, ती गर्द आम्रछाया, तें मोत्यासारखें निर्मल जल. तो झुळझुळू वाहणारा ओढा, ती धर्मशाळा व जवळच फुलाफळानीं बहरलेला सुंदर बाग, तें सर्व पाहतांच माझा थकवा पार नाहीसा झाला. त्या निर्मळ जलाने माझी तृषा शांत झाली आम्रवृक्षाच्या छायेखालीं बसताच, मी एकाद्या थंड ठिकाणी आल्याचा मला भास झाला.

पंडित बनसीधर प्रसाद तिवारी यांनी आपल्या मातापित्यांच्या स्मरणार्थ केलेले ' भव्य–स्मारक " पाहून मला अतिशय आनंद झाला आम्ही संध्याकाळी घरीं परतलों.

पण माझ्या डोक्यांत अेक वेड शिरले, कीं अशा पुण्यवान् कर्तृत्वशाली व्यक्तीचेंचरित्र आपण लिहिल्यास व त्यांनीं आपल्या वडिलांचे नांवानीं जें भव्य स्मारक केलें आहे, त्याचें काव्यांत वर्णन केल्यास, आईबापाची निस्सीम तनमनधनानें सक्रिय सेवा करणाऱ्या एका पुण्यात्म्याचे चरित्र वर्णन केल्याचे श्रेय आपल्या पदरी पडेल. पुंडलीक, राम परशुराम, शिवाजी ज्यांनी आजन्म मातृसेवा केली. त्यांचीं चरित्रें गायलीं गेली मग या पुण्यपुरुषाचें चरित्र गाण्यांत कमीपणा काय? तो गृहस्थ जगांत प्रसिद्धीस आला नसेल. त्याने राजकारणाचें डाव फार खेळलें नसतील, वर्तमानपत्रांत त्याचें नांव झळकले नसेल, म्हणून त्यानें केलेले सत्कार्य कमी प्रतीचें ठरतें काय?

पंडित बनसीधरना मी आपले आत्मचरित्र " आईचा आशीर्वाद " या नावाने लिहिण्यास व तें प्रसिद्ध करण्यास परवानगी मागितली. व त्यानीं ती प्रेमानें दिली म्हणूनच देवकन्येचे हे पांचवे पुष्प वाचकांच्या हातीं देण्याचा सुयोग आला.

धर्मशाळा, विहीरी, बाग, ही करण्यासाठी व जमीन खरेदी वगैरे साठी सर्व पूर्ण होण्यास त्यांना जवळ जवळ अर्धापाऊण लक्ष रुपये खर्च

आला असें त्यांनीं मला सांगितले व हिशोबाचा तपशीलहि दाखविला. इतका अफाट पैसा खर्च करून बनसीधर प्रसाद यांनी जें आईचे भव्य स्मारक उभारलें, त्या बद्दल त्यांचे जितके कौतुक करावें तितकें थोडेच होईल. प्रख्यात डॉ. जी. टी. क्षीरसागर यांनी या काव्यसंग्रहास गोड व समर्पक प्रस्तावना लिहिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे तसैच माझ्या आतां पर्यंतच्या काव्य व गद्य संग्रहाचा पुरस्कार करून योग्य अभिप्राय दिल्या–बद्दल लोकनायक मा. श्री. अणे, डॉ. शं. दा. पेंडसे, कवि यशवंत, सोनोपंत दांडेकर, मु. मा. घाणेकर, डॉ. प्र. न. जोशी, ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर, केशवराव अचनूरकर इत्यादि साहित्यिक रसिकांचें मी पुनः आभार मानतो.

छपाईचे व ब्लॉकचें काम उत्तम केल्याबद्दल प्रेसचें मालक श्री. व. वि. आपटे व ब्लॉक मेकर श्री. भिडे, यांचे आभार मानून इतर काव्य संग्रहाप्रमाणें याहि संग्रहास थोर रसिक आदरानें व प्रेमाने पहातील ही सदिच्छा व्यक्त करून हें लांबलेले निवेदन संपवितो.

धाराशिव
दि. २६–१२–१९५९

**श्री. रा. देव**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......................... वि: ..............
क्रमांक ........... नों. दि ..............

# आईचा-आशीर्वाद

90328

आर्या १

धारूर ग्रामीचा होता विठ्ठल प्रसाद सद्विप्र ।
पत्नी सोनाबाई नामें शोभे तयास अनुरूप ।

दिंडी २

पिता विठ्ठल तो माय सोनुबाई ।
जया योगें प्राप्त हो धन्यता ही ।
पुत्र झाला पंचमी माघ वद्यी ।
तोच बनसी जाहला ख्यात लोकीं ।

## दत्तक प्रकरण

आर्या ३ प्रसंग १

दुर्दैवे बनसीच्या तुटला आधार जो पिता त्याचा ।
फुंदाबाई जाऊ दुष्टा, रचि डाव तोंच कपटाचा

दिंडी ४

एक होती फुंदेस सुता राधा ।
तिला बघुनी मानीत होति धन्या ।
परी सौख्यी कालवी गरल आप्त ।
दत्तकाते घेणेंच तुला प्राप्त ।

मात्र माता फुंदा व कन्या यांच्या स्वभावभिन्नता पहा

फुंदा होती ज्वालाग्नी ती राधा जलशीत ।
दुष्ट राक्षसी होती फुंदा राधा देवी शांत ।
द्वेष असूया फुंदा नटली निर्मत्सर राधा ।
परोपकारी होती फुंदा परहित रत राधा ।
घशांत अपुल्या सर्व पडावे वृत्ती फुंदेची ।
इतरांसाठी देह झिजावा वृत्ती राधेची ।
आल्या अतिथा द्यावें मुठभर स्वभाव राधेचा ।
अतीथि येतां फणफणाट हो शरिरी फुंदेच्या ।
गारगोटी जरी होती माता, होय हिरा राधा ।
काटयांमधुनी गुलाब जन्मे गुलाब हो राधा ।
हिरण्यकश्यपु होता राक्षस देव प्रल्हाद ।
भांगेमध्यें तुळस जन्म घे कधी कधी सत्य ।
चरित्रनायक बनसी याची भगिनी हो राधा ।
बनसीसाठीं शरीर आपुले ओवाळी धन्या ।

वृ. चामर ५

अर्धभाग दत्तकास, अर्धभाग बनसिला ।
न्याय योग्य हा दिसे करितसू विनंतिला ।
अर्ज हा लिहुनिया द्वेष पूर्ण साधिला ।
मत्सराग्नि पोळताच माय गाळि अश्रुला ।

यांत धारूरचे वरेच प्रतिष्ठित नागरीक होते. खटला बीडला होणार होता. बनसीधरच्या चुलतीकडून २६ गाडया भरून साक्षीदार लोक आले होते. बनसीधरच्या आप्तांनीहि एक कपिला गाय व थोडी तुलसीदलें बरोबर कोर्टात आणली होती

दिंडी ६

यांत होते गांवचे देशपांडे । तसे धारुरचे जन मोठमोठे ।
पुरोहितही द्यावया साक्ष खोटी । इतर तैसी पोटार्थ मंडळी ती ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक........................ नों. दि: ....................

आर्या ७

सव्वीस गाड्या भरूनि पूर्ण । साक्षीदार खोट आणून
कराया सत्याचा खून । न्यायालयीं पातले ।

शपथ वाहून व तुलसीदल हातात घेऊन खरें बोलण्यासाठीं त्यांनी

मु. प्र. ८

कपीला पहा आणिली तेथ गाय ।
खला लाजवाया खरा हा उपाय ।
परी वाटतें लाज नीचास काय ?
धनासाठी जें अर्पिती सर्व काय ।

दिंडी ९

साक्ष द्यावी धरुनियां पुच्छ हातीं ।
तुलसिदलही घ्यावेंच तसें हातीं ।
वेळ येतां कांपती थरथरां ते ।
पुच्छ तुलसी पाहूनि लाजले ते ।

कोणीही पुच्छ धरीत नाहीत हें पाहून न्यायाधीश चिडला व यांत खात्रीनें कांही काळेंबेरे आहे असें त्यास वाटलें व तो मनांत म्हणाला

पृथ्वी १०

असे डाव हा मांडिला कीं खलांनी ।
हराया धनां सांडिलें सत्य यांनीं ।
पहा हा खलांचा असा नाच नंगा ।
किती दुष्ट ऐसे करीतात दंगा ।

न्यायाधिश--

पद ११

संभावित हे जमले येथें कसे थोर थोर ।
लुबाडिती हे बाया पोरां नित्य किती चोर ।
माडि हवेल्या बांधिति खल हे चैन खरी यांची ।
दैना होते उन्हांत तापुनि मात्र गरीबांची ।

जारिणि लोळती सुखें मंचकी नागविती धनिकां ।
इथें जीर्ण ते वस्त्र न मिळते साध्वींना, रंका ।

न्यायाधिशानें मग बनसीधरला व दत्तक पुत्राला आपले वडिलांचें नांव विचारले.

बनसीने विठ्ठल प्रसाद हें नांव बरोबर सांगितले पण दत्तकाने मात्र आपल्या खऱ्या पित्याचे नांवच सांगितलें.

दिंडी १२

नांव बनसी सांग बा पित्याचें तूं ।
असे 'विठ्ठल' बोलला या न किंतु ।
दत्तकाते तो प्रश्न यदा केला ।
खरें जनकाचें नांव कळे त्याला ।

स्रग्धरा १३

रागानें लाल झाला परिसुनि वच तें मुख्य न्यायालयाचा ।
सारा हा डाव आहे कपट पटु अशा निश्चयें या खलाचा ।
झाल्या ज्या साक्षी त्याही उलट सुलटशा सत्य बाहेर आले ।
सत्यातें नाश नाहीं विजय सतत हें प्रत्यया तत्व आलें ।

बनसी--

पद १४

विजय झाला आमचा या प्रकारें ।
द्वेष वाढू लागला तप्त सारे ।
परी मातेचा अभय कर शिरीं ज्या ।
विजय होतो सहजेंच निश्चिती त्या ।

## प्रसंग २ रा

मुकदमा बनसीसारखा झाला. त्यामुळें द्वेषभावना जास्तच भडकूं लागल्या. गावांतील गुंडांनी बनसीच्या आईस सांगितले कीं,

पद १५ हे कोण

आप्त हे माजले फार। करणार पुत्र तव ठार।
जा सुखें माहेराला तूं। घेऊनि आपुला पुत्र।
ना तरी घात होणार। पुत्र हा बळी पडणार।
वंश गे तुझा बुडणार।
तत्काल माहेरी जाणें। होणार पुत्र हा ठार।

पृथ्वी १६

सुतास मग घेउनी जननि ती निघाली त्वरे।
परीक्षण नको मुळी गरल जें तयाचे बरे।
गृही कुणि न रक्षणां बघुनीं संधी साधी खल।
लुटूनि घर तें तदा पळविती धना सत्वर।

घरांत जें दिसले तें सर्व लुटुन नेले पण तिजोरी फुटेना.

पृथ्वी १७

परी न फुटली मुळीं, दगड मारितां पेटिका
प्रभूविण दुजा कुणी करिल सत्य सांभाळ कां ?
सुवर्णधन तेवढें गवसलें अम्हां तेधवां
असें बघुनि वाटली क्षणिक लाज त्या बांधवा !

यांतही त्यांना अपयश आल्यामुळें दुसरेंच कारस्थान दुष्टांनी रचिलें..

पद १८

अल्पवयी हा बालक आहे कोणि न या वाली
कोर्टांनी ही दौलत याची अंकित ठेवावी

लांच घेउनी अधिकाऱ्यांनीं जप्ती आणविली
माल धनादिक पसार करूनी, दुष्ट करिति केलि
आंत रिकामे सर्व सदन तें, मोहरा त्या दिसल्या
जिव्हाग्रावरि गोड मधू परि, गरल भाग मधला
एक दोन ना अनेक आलीं विघ्नें बन्सीला !
वर्णन करतां चर्वित चर्वण गमेल श्रोत्याला
प्रयत्न सारे विफलित झालें अनेक शत्रूंचें
द्वेष, असूया वाढु लागली, सार हेंच याचें
प्रयत्न केले अनंत, बनसी माराया त्यांनी
मारेकरिहि पाठविले, तो जाया यमसदनीं
विष सातूतुनि कालवुनीही तयास कीं दिधलें
गरलाचें परि अमृत झालें, नवल पहा घडलें
किती भयंकर कारस्थानें केलीं नीचांनीं
त्यांतुनि एकचि कथन करी मी दुष्टांची करणी

## प्रसंग ३ रा

पद्य १९

व्रतबंधाचा निश्चय केला घरांत मामांनीं
यथासांग ती तयारि झाली, थाटामाटांनी
रंग सफेदा घरास दिधला ! स्वच्छताहि झाली
मंगलमूर्ती दारि लाविली शुभदिनि शुभ वेळी
व्रतबंधाच्या संस्काराला प्रारंभहि झाला
मातुश्रीच्या भिक्षेचा क्षण मंगल आला
मांगल्यीं या अमंगलाचें गरल पहा पडलें
यज्ञीं विश्वमित्राच्या हो ! विघ्न पहा आलें

चुलती अमुची राक्षसीण ती मंगल नाशाया
स्नेह टाकुनी गृहा पेटवी मंगलशा समया
'ॐ भवति गे भिक्षां देही' घोष असा चाले
"अग्निकाष्ठ" ही भिक्षा पदरी चुलती घे बोले
शिरतां अग्निकाष्टांची हो होळी ते झाली
काडकाड हा नाद जाहला, दैना अति झाली
सैरावैरा ब्राह्मण सारे पळूं लागले हो !
मातुश्रीच्या अश्रुजलानें शांत वन्हि होय

दिंडी २०

लवण पडलें पायसीं आमुच्या हो
दुग्धि पडली शर्करा खलांच्या हो
राम जातां काननीं शोक सर्वा
कैकयीतें जाहला हर्ष तेव्हां

पृथ्वी २१

असंख्य असल्या किती मजसि पातल्या आपदा
परी यश न लाभले मुळिहि शत्रुला एकदां
नवाब अति गांजला अपयशेंचि संतापला
कुकर्म फल मस्तकी पडुनि नाश तो पावला

धारुरला दर वर्षी आर्यसमाजाचा उत्सव होतो. एका उत्सवांत मुंबईहून योगीश्वर पंडीत दौलतराम शास्त्री संस्कृततज्ञ आले त्यांना पाहून

पृथ्वा २२

सतेज मुख पाहुनी नमत भाल ज्याच्या पुढें
तपश्चरण तेज तें स्तिमित लोकही जाहलें

समाधि बघुनि मला खचित वेड तें लागले
धनगृह प्रपंच हें सकल पाश मीं तोडलें

दिंडी २३

ठाम केला सिद्धांत मी मनांत
काल जावा साधुच्या संगतींत
परी ठावें सिद्धांत हा सदाचा
' विघ्न येतें सत्कार्यि ही कुणाच्या '

पं. दौलतराम शास्त्री यांचें बरोबर जावें पण मामा कुंजनप्रसाद म्हणाले बनसी आपल्याबरोबर आला तर त्याच्या विरहाने त्याची आई प्राण सोडील, तुम्ही त्यास नेऊं नका. हे ऐकतांच पंडितजींनी बनसीस बरोबर नेण्याचें टाळलें.

माता गुरुजीस म्हणाली.

पद २४

विंशति वर्षांचा बाळ ! नाहीं गुरुवर्या
जन्मापासुनि ना सुख यास
झाला याते किति वनवास
बनसीवरती माझी आस
' सारी गुरुवर्या
जनक सोडुनी स्वर्गीं गेला, बालपणीं हा अनाथ झाला
दिवस कंठि मी पाहुनि याला आजवरी गुरुवर्या
बाल बन्सी हा नेतां कोणी, प्राणहि जातिल माझें निघुनी
वियोग याचा सहन न म्हणुनी होई गुरुवर्या

पृथ्वी २५

तुला विपदि लोटुनी मज नको तुझा बाळ गे
' सुखी उभय व्हा तुम्ही वदुनि, साधु शास्त्री निघे

न, मास, पुरता सरे पळुनि जाय बनसी तदा
पथ क्रमुनि गुप्तशा त्वरित गाठि शास्त्रीपदा

सकाळी पहातात तो बनसी घरांत नाही. कुठें गेला असावा? चोहोंकडे शोध केला, पण–

---

## शिक्षणासाठीं पलायन

शा. वि. श्लोक २६

केला शोध परोपरी न परि हा बन्सी कुणा सांपडें
सोनू माय तदा अहर्निश रडे, सर्वा पडे सांकडे
'राहो बाळ सुखी कुठेंहि असला, चिंती मनी माय ती
कंठीं काळ सदा मनीं तडफडे, पाण्याविना मासळी

ओंवी २७

इकडे पंडिताचें घरीं, बनसी अध्ययना करी
अष्टाध्यायी पूर्ण, झाली गुरुप्रसादें

एके दिवशी गुरुजी पाठ देतां देतां त्यांचा डोळा लागला. कांही वेळाने ते जागे होऊन लागलीच बनसीला म्हणाले बनसी ! तुझी माता आजारी आहे. ती तुझी आठवण करते. तरी लवकर तू येथून जा.

स्त्रग्धरा २८

बनसी ! तूं जाइ आतां सदनि लवकरी त्रासली माय भारी
साहेना बाळ ! तीते विरह घडि भरी, साध तूं मुक्ति चारी
बनसी तो क्रुद्ध झाला गुरुसि वदला काय ते पूर्ण ऐका
मातेची तूंच माता जगति मजला, तारिते हीच नौका

त्यावर गुरुजी म्हणाले.--

एकदां महर्षी दयानंद असेच मातेचें न ऐकतां बाहेर निघून गेले. पुष्कळ अध्ययन केलें पण कोणत्याही सभेंत त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव पडेना व प्रत्येक वेळीं त्यांना अपयश येऊं लागले. इकडे मातुश्री रडून आंधळी झाली. व आंधळ्या स्थितींतच तिचा अंत झाला. तें पातक दयानंदास लागल्यामुळें त्यांस जिकडे तिकडे अपयश येऊं लागलें. नंतर त्याचें प्रायश्चित्त म्हणून तपश्चरण केल्यावर तो दोष नाहीसा झाला. व पुढे त्यांस यश आलें व त्यांच्या वक्तृत्वाचा परिणाम लोकांवर होऊं लागला. दयानंदासारख्या महर्षींची ही हकीगत. मग तुझी काय कथा ? म्हणून तुला मी सांगतो कीं

दिंडी २९

**जाय बाळा ! जननिची भेट घ्याया**
**प्राण मातेचें जाइ वांचवाया**
**उद्यां जरि ना जाशील येथुनी तूं**
**पाठ होई बंद वा ! या न किंतु**

मला अत्यंत वाईट वाटलें. मी रडूं लागलो व म्हणालो--

पद ३० भी. प.

**माझें दैव कसें फिरलें ! पूर्व पुण्य ते विलया गेलें**
**मायगुरुचें पाय धरावें । कीं जननीचें दर्शन घ्यावे**
**कांहीं सुचेना काय करावें ।। भान मला नुरलें**

दुसरे दिवशी एक रजिस्टर्ड पत्र मला आले. त्यांत गुरुजींनी सांगितलेला मजकूर होता. मी तें पत्र गुरुजींना दाखविलें. गुरुजींनी माझी फारच तळमळ पाहून मला समुद्रकांठी नेऊन दोन योगाचे प्रकार शिकविले. व हे तूं नित्य करीत गेल्यास तुझे मनोरथ पूर्ण होतील असें सांगितलें. मी नाइलाजानें गुरुजींचा आशिर्वाद घेऊन रात्रीच्या बाराच्या गाडीनें घरी

जावयास निघालो. सकाळी ९ वाजतां मी धारूरला आलो. घराजवळ कांही गल्लींतील मुलांनी मला पाहिले व लगेच ते आमच्या घरी जाऊन वनसीभय्या आये असें माझ्या आईजवळ बोलले. माझी आई आसन्नमरण झालेली, पण पुत्रवात्सल्यानें अंथरुणावरून उठली व तशीच शक्ती नसतां-नाही दारांत येऊन माझी प्रतिक्षा करूं लागली.

मी दिसतांच दारांतच तिनें माझ्या गळ्याला मिठी मारली व मला छातीशी धरून तिने मोठी किंकाळी फोडली व मला म्हणाली, वनसी !!

पद ३१

**बाळा कां राग तुला आला ? टाकुनि मजला एकाकी कां**
**गुप्तपणानें गेला तूं कां । काय दुखविले तुला कधीं कां ।**
**विनवी पुत्राला ।**
**वियोग तव हा असह्य झाला । अंधपणा मज नेत्रीं आला ।**
**प्राण मुठींतचि माझे आतां । कळे न कां तुजला ।**

पृथ्वी ३२

**गळां पडुनि ती रडे ढसढसा सुताच्या तदा ।**
**जले सकल नाहलें शरिर तें सुताचें पहा ।**
**तदा चरणीं वाहिलीं स्वजल अश्रुची अंजली ।**
**अनंत अपराधि मी करी कृपाच बाळावरी ।**

अशाही स्थितींत तिनें मला घरांत नेलें व स्वतः आपल्या हाताने मला जेऊं घातलें. नंतर माझा तिनें विवाह केला.

----

# विवाह

ओवी ३३

**बेडी पडली लग्नाची दगदग वाढे प्रपंचाची**
**विस्मृति झाली परमार्थाची दैवगती विचित्र !**

पुढें वकिली, तहसिलदारी, तालुकदारी, मौलवी आलम, महासवी व वैद्यकी या परिक्षा देऊन त्यांत उत्तमप्रकारें उत्तीर्ण झालो.

माझ्या हैद्राबादच्या कांही आप्तांच्या वशिल्याने मला प्रथम तात्पुरती तहसीलदाराची जागा मिळाली व लागलीच मी कायम तहसीलदार झालो. तेव्हां:-

शा. वि. ३४

**झालो मी अधिकारि ईशकृपया तहसील कार्यालयी**
**केली सांग पुजा मला भुषविलें सत्कारही देऊनी**
**केलें मी जननीस वंदन तदा माता रडे स्फुंदुनी**
**याचें कारण ना कळेंच मजला, आश्चर्य वाटे मनी**

मला अधिकारपद प्राप्त होतांच जसा सर्वांना आनंद झाला तसाच किंबहुना त्याहूनही जास्त आनंद आईला वाटावा. असें न होतां उलट तिला दुःख कां वाटले असें माझ्या मनांत येऊन मी तिला विचारलें " आई तूं या प्रसंगीं दुःख कां करतेस ?" त्यावर आई म्हणाली-

शा. वि. ३५

**झाला तूं अधिकारि दुःख न मला, जाशील देशांतरी**
**बाळा ! आनन ना दिसेल तवही हें दुःख देहांतरी**
**झाला तूं अधिकारि यांत मजला वैषम्य कां वाटतें ?**
**'पुत्रा राज्यपदी बघूनि जननी कां खिन्नता पावते ?**

नोकरीवर असतांना एका गृहस्थाचे महत्वाचें काम माझ्याकडून झालें. त्यामुळें प्रसन्न होऊन त्यानें पेशकारच्या हातीं एके दिवशी रात्री १५०० रु.

90324

मला दिले. मी थक्कच झालो व पेशकाराला म्हणालो माझा हा निरोप त्या गृहस्थाला जाऊन सांगा.

दिंडी

लांच मुळि मी घेणार ना कधीही । आण ऐशी वाहिलीं विठ्ठली मी
कनक तुमचें मज मृत्तिके समान । भीक बरवी, यांसी न देइ मान

अशा रीतीनें नोकरी व्यवस्थित व प्रामाणिकपणें चालली असतां एकाएकी घरून पत्र आलें.

पृथ्वी ३७

बरें न मुळि वाटतें जननिला कधी पासुनी
दुजा न तिज ध्यास ही मुळिच रे ! तुझ्या वांचुनी
जरी जननिची तुला स्वमनि कांहीं खंती असे
त्वरें जननि दर्शना निघुनि येइ बाळा कसे

पत्र पहातांच कोणत्याही प्रकारें विचार न करितां पेशकारला चार्ज देऊन तावडतोब धारूरला आलो.

दिंडी ३८

त्वरें तेव्हां धावूनि घरीं आलो । माय बघतां पंजरीं स्तिमित झालो
मला बघतां आनंद तिला झाला । प्रकृतीचा परि मान वाढलेला ।

त्या वेळी आमच्या गांवी एक चांगले धन्वंतरी वैद्य रहात होते. त्यांचा उपचार बरेच दिवस केला पण कांहीच गुण नाही. दैवदुर्विलास पहा--

पद ३९

वैद्य आणिलें उपाय केले, धन्वंतरि थकलें
क्षीण अधिक तें शरीर झालें, उपाय ना चाले
पाजविलें कुणि गरल जननिला, ज्ञात न कवणाला
हळूहळूं परि प्रभाव त्याचा जाळी शरिराला

ज्याची भरली घडी तयाची दया न ये काळा
आयुष्याची दोरी तुटली, कळलें सर्वांना

०० ०० ००

देहातांचा समय पातला, जननी बोलावी
'बनसी ! बाळा ! मांडी देई, जाते तव आई !'
दो वर्षाचा नातू माझ्या, इंद्रमोहनाला
सांभाळी बा ! विनवी तुजला, तुझ्या सुपुत्राला

मला कळून चुकले कीं आपली आई आतां कांही वांचत नाही. म्हणून मी तिला मांडी देण्यापूर्वी कपाटांत एका औषधाचा शोध करूं लागलो. तें मला एका हैद्रावादी डॉक्टरनें दिले होते व हें औषध जपून ठेव जनावराच्या वगैरे जखमेंत किडे झाल्यास याचे दोन थेंब त्या जखमेवर टाक म्हणजे किडे तावडतोव मरतील. पण जर कां हें मनुष्याच्या पोटांत गेलें तर त्याचा तावडतोव प्राण जाईल. म्हणून मी विचार केला कीं हें औषध आपण घेतल्यास आईबरोवर आपलेंही प्राणोत्क्रमण होऊन जगांतील दु:खांचाही आपला शेवट होईल.

पद्य ४० (भूप–वंदन त्या ईशा)

जालिम विष ते प्राशन केलें, प्रहर एक झाला
परि ना तिळही प्रभाव त्याचा शरिरावर झाला
देतां मांडी राममंत्र हा माय मुखीं घेई
लोटुनि आम्हां दु:खी अमुची जननी ती जाई

अशा प्रकारें सर्वांना दु:खसागरांत लोटून बनसीधरची माता परलोकीं गेली. पुढें बनसीवर बरेच कठीण प्रसंग आले.

----

# प्रसंग ४ था

श्लोक ४१

रजाकार सत्तामदें धुंद झाले
अनाचार त्यांचें सदा क्रूर चाले
दया, ती कशी, त्या न कांहींच ठावें
जनत्रस्त झालें अती तत्स्वभावें

पद ४२

एके दिवशीं प्रात:काळी धारुर गांवांत
हृदयद्रावक प्रकार घडला ऐका, द्या चित्त
कांहीं मराठे जातचि होते कोठें लग्नाला
स्त्रियाहि होत्या त्यांच्यामध्यें ऐशा समयाला
वादविवाद न झाला कांहीं, किंवा अपराध
गोळी घालुनि ठारचि केलें, हरिण जसा व्याध
एकामागुनि एक मराठे देवाघरि जाती
रजाकार त्या खंति न वाटे, क्रूर किती जाति
गावी होता तरणाताठा वीर काशिनाथ
अन्यायाचीं होती त्याला चीड असोनात
सत्य–न्यायासाठीं झगडत, होता तो सतत
असंख्य असले वीर जन्मले भारत देशांत
डोळा होता त्यावर म्हणुनी रजाकार यांचा
संधि साधुनी करिती त्यावर मारा दगडांचा
बंदुक होती जवळी त्याच्या हिरोनि घे गुंड
लाठ्या काठ्या मारिति त्याते, माजविती बंड
तुरी देउनी सार्‍यांना तो वकिल्या हो गुप्त

शिरला माली पाटिल सदनीं, झाला आक्रांत
बंद दार नी कडी घातली आंत वकील्याने
मागोमागहि गुंड धावलें, अतीव वेगानें
' पटेल ! खोलो दरवाजा तुम् मानो ये बात
नाहक ना तो आज तुम्हारी आयेगी मौत
कुटुंब, बालें, रडूं लागलीं, आक्रंदन त्यांचें-
सहन न झाले म्हणूनि वकिल्या उघडी दारातें
शूर वीर तो बाहेर येतां, काय पुसायाचे ?
भाले वरच्या मारुनि केलें, तुकडे शरिराचें
तसाच धरिला, तेल टाकुनी कपडे पेटविलें
जिवंत वकिल्या तिथें जाळिला, रजाकार काळें

श्लोक म. माला ४३

ऐसा धुमाकूळ तो चालवीला
तिथें धारूरी तो किती सांगणें ?
श्रीमंत ग्रामस्थ गांठूनि सारे
तया आडवीती किती शक्तिनें
ठेवा इथें दागिनें, तेंचि नोटा
जरी प्यार वाटे तुम्हा प्राण तें
नाहीं तरी खून आम्ही करूनी
स्त्रिया भ्रष्टवूं हें तुम्हां सांगणें

असें म्हणून त्या नीचांनी घरांत घुसण्यास आरंभ केला. कांहीच्या स्त्रियांना बाहेर रस्त्यांत आणून पतीच्या समोर त्याना नग्न केले. हे पहातांच घरंदाज माणसांनी-

दिंडी ४४

माडिवरुनी फेकिती अलंकार
होय साऱ्या कसब्यांत हाहाःकार
भस्म करूनी वकिलयास, राख त्याची
नदीमध्यें फेकूनि दिली साची

आर्या ४५

होता सण पोळयाचा होता, जन धांदलीत पोळयाच्या
कसब्यांत काय घडले, पत्ता पेठेंत ना कुणा याचा

दिंडी ४६

बंदुकांचा आवाज पडे कर्णी
लोक कांहीं धावलें तया स्थानीं
परी होउनि दुष्कृत्य सामसूम–
पूर्ण दिसली कसब्यांत तदा पूर्ण

अमावास्येची रात्र. काळयाकुट्ट अंधाराचें साम्राज्य चोहोकडे पसरलें आहे. रजाकारांच्या छळाने व धाकाने आधींच अर्धे अधिक लोक बाहेरगांवी मुलांबाळासह गेलेले. पण गरीब बिचारे आपला जीव मूठीत धरून कसे तरी दिवस कंठू लागले. वरील प्रकार होतांच कांही आणखी रात्रीच्या रात्री गावांतून पसार झाले.

वकिल्याच्या खुनाची दाद कशी लागावी? मांजराच्या गळयांत घंटा कुणीं बांधावी?

पण कांही आर्यवीर रजपूत, धार्मिक शूरवृत्तीची माणसें, गावातील प्रसिद्ध नेता श्री बनसीधर (आमचे चरित्रनायक) यांचे कडे आले. आमच्या नायकानें धैर्य दिलें व सर्वांनी मिळून पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, निझाम, कोतवाल वगैरे कडे तारा केल्या.

रजाकारांच्या सालारला ही बातमी लागतांच त्यांनी एक दवंडी पिटविली व आमच्या चरित्र नायकावर सर्व आरोप टाकला. गावांत जर कोणी बदमाष आगलाव्या असेल तर बनसी.

लावणी ४७

**चहुंकडे द्वाहि फिरविली । दौंडि पेटली ।**
**सर्व गावांत ।**
**॥ माजला नीच कुणी बनसि याच गांवांत ॥ १ ॥**
**जो कुणी धरूनि त्याजला ॥ आणि या स्थला ॥**
**॥ त्या सही देऊ ॥**

**आम्ही हजार मोहरा दान**
**ठेवून तयाचा अतीव ही मान**

यानंतर ५–६ दिवसांनी पोलीस आले. चौकशी सुरु झाली. आल्या-बरोबर पाटलास धमकी देतांच तो त्यांच्या सारखें बोलूं लागला.

पद ४८

**पाटील मीच गांवाचा । सत्य हे**
**खून ना जाहला येथें । सत्य हे**
**आलें न विघ्न पोळ्यांत । सत्य हे**
**मिरविलें बैलही आम्ही पूर्ण गावांत ॥ सत्य हे**
**शांतता होति ही तेव्हा सांगतो सत्य ही मान ।**

वकील्या उघडपणें गोळी घालून ठार केला असतांही रजाकार निर्ल-ज्जपणें म्हणाले—

ओवी ४९

**वकील्या आहे जिवंत**
**आम्ही पाहिला वडगांवात**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम ......... वि: ...
नों: दि: ...

बोले 'उदगीरकडे' जातो

कांहीं कामासाठीं

यावर चोराच्या उलट्या बोंबा---

दिंडी ५०

खून झाला धारूरीं वकिल्याचा

असें कारण रजपूतकट घराचा

प्रेत त्याचे गाडींत घालुनी तें

नेत होते रजपूत बाहेरी तैं

अशी साक्ष रजाकारानी दिली. दिल्लीस केलेल्या तारांच्या चौकशी-साठी निझामाला खलिता आला.

चौकशीसाठीं निझामानें धाराशिवच्या मुसलमान वकील एकरामुल्लाची योजना केली.

(५१ कटाव)

धाराशीवचा एकरामुल्ला । प्रधान दैवें तेव्हा बनला

नायब नाझम भाग्यपुरीचा । तसा कलेक्टर

बिदरपुरीचा । मर्दुमकीची साक्ष-पटावीं ।

दंगा मस्ती कुणि न करावी । म्हणूनि आले

पोलिस शंभर । लॉऱ्या फौजा आल्या भर भर

रजाकार ते आलें तत्पर । त्यास नोकऱ्या दिधल्या

सत्वर ।। त्या समयाला ।। पाटील पहा अणवीला

श्लोक ५२

तदा सैन्य-वर्तूल केले खलांनीं

तिथें टाकिल्या कांहिं खुर्च्या मधूनी

अम्हां ठेवलें मध्यभागीं अणूनी
म्हणे वृत्त सांगाच देवास्मरूनी

अधिकारी मोठ्या तोऱ्यानें पण कपटभावाने व्याख्यान देऊं लागला,

पद्य ५३

धारुरवासी सज्जन जनहो ! बघतां तुम्हांस
मोद जाहला आम्हां सकला खराखरा आज
हिंदू मुस्लिम ऐक्य पाहुनी तुमच्या गांवाचें
लाजतील कीं अम्हां वाटे देव स्वर्गीचें ।
पाटिल तुमचा देव खरोखर वदला आम्हांस
" शांतताचही गांवामध्यें नांदे," ना त्रास "
' अमन कमेटी ' आहे गांवीं कार्य करी चोख
कुणी न दुःखी अमुच्या गांवीं धन्य आम्ही लोक ।।

पद ५४

भाग्य खरोखर, वजीर आलें तुमच्या भेटीस
त्रास, अडचणी कांहीं सांगा त्यांना प्रत्यक्ष

०० ०० ००

जिकडे तिकडे शांती नांदे प्रेत बनति सारें
ज्वालामुखि तो धुमसत होतां शांत वरी सारे

पद ५५

टकमक पाहुं लागली परस्परीं जनता
झाली छाती नाहिं कुणाची फोडाया वाचा ।

कांहि त्यांतले करूं लागले खूणचि बनसी ते
बोला कांहीं बनसीधरजी तुम्ही तरी वेगे

पद ५६

बनसीधरजी म्हाणाले.

जीवित आतां शक्य न अपुलें इथें रहायाचे
मरणाची मग भीति कशाला, सार्थक जन्माचे
सर्व हकीकत खरी खरी जी घडली गावांत
निर्भय होउनि वदलो, झाली आग मस्तकांत

पद ५७

अधिकारी--

निराधार हा गप्पा मारी बनसी तोऱ्यांत
मुस्लिमांचा द्वेष्टा गमतो, पहा किती धीट ?
कडेकोट या पहाऱ्यामध्यें असतां या गप्पा--
मारी इतुक्या, खोटचा तारा केल्या का शंका ?

दिंडी ५८

हाच दिसतो अपराधि खरा आम्हां
कैद करूनी येथून तरी न्या हा
परी पटलें ना कृत्य सज्जनाला--
थोर अधिकारी पोलीस नाझमाला

नायबनाझमाची खात्री झाली कीं हे सर्व खोटे आरोप आहेत. त्यांनी बनसीला जीवदान देण्याचें आश्वासन दिलें व मला म्हणाला.

पृथ्वी ५९

**असें तरुण वीर हा सरस, सत्यवादी खरा**
**मुळीं न मरणीं असें खचित भीति या लेकरा**
**तुला अभय मी वदे धरि न यांत शंका मुळीं**
**खरा सुजन जन्मला मजसि वाटते सत्कुलीं**

असें म्हणतांच रजकार जास्तच खवळले. अशा अनेक आपत्तीतून मी वाचलो. याला माझे पुण्य कारण नसून देवाचा व माझ्या आईचा आशिर्वादच कारण होत.

पुढें पोलीस ॲक्शन झाली व माझी अनेक छळातून आईच्या कृपाप्रसादानें मुक्तता झाली. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला हेंच सांगतात.

स्रग्धरा ६०

**धर्माला ग्लानि येते धरणि वरति या, माजति दुष्ट जेव्हां**
**अन्यायें सज्जनातें, छळिति सतिसही सोडुनी ताळ ते**
**त्यांच्या नाशा करूनी दुरित सकलही नाश, तो व्हावयाला**
**अभ्युत्थानार्थ धर्मा सतत जनन मी पांडवा ! घेत तेव्हां**

---

# प्रसंग ५ वा

तत्वत: जेथें धर्मतत्वांतच विरोध आहे, आचारांत व विचारांतहि भिन्नता आहे. अशा भिन्न धर्माचें ऐक्य होईल असें म्हणजे विळया भोपळ्याचे वा मांजर उंदराचें सख्य होण्यासारखें होय.

त्यांतून अधिकस्य अधिकं फलं या न्यायाने हिंदूंची होळी व यवनांचा मोहरम हे सण एकाच वेळीं, एकाच महिन्यांत आले. मग काय? विचारतां.

आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला या म्हणीची आठवण आल्यावांचून कशी राहील ?

पद ६१

**पूर्व पश्चिम दिशा मिळाल्या, अपूर्व कीं झालें !**
**नमाज, संध्या, नद्या मिळाल्या, लोक सकल वदलें**

०० ०० ००

**शिमगा आला मोहरम आले शंख करिति लोक**
**धुंडा राक्षसि जन्मा आली घेउनिया रूप**

०० ०० ००

**होळी पेटतां शिरेल गोळी रजाकार म्हणती**
**वार्ता कळवी अमिना तेव्हां पाटिल वेगें ती**

०० ०० ००

**संध्या समयीं रझाकार ते जमले होळीशीं**
**विझवुनि होळी लाथेखाली तुडविति पायाशीं**

विघ्न आणिले अग्नि पूजनी सर्व असूरांनी
किती ऐशा मर्कट चेष्टा केल्या नीचानी !

०० ०० ००

यज्ञरक्षणीं विश्वामित्रा छळिले असुरानी
मर्दन असुरा केलें तेव्हां राम लक्ष्मणांनीं

०० ०० ००

बळी मातला छळूं लागला मदांध होवोनी
पाताळीं त्या घातलें न कां, तदा वामनानीं ?

पद ६२

पशु पक्ष्यादिक अनंत मरती ज्याच्या फूत्कारें
कलिया न का पूर्ण मर्दिला अमुच्या कृष्णानी
असुर माजले धरणीवरती, करितां अन्याय
अवतार न कां झालें वेळी, दावाया न्याय ?

पद ६३

रावण सत्ता विलया गेली छळिता सीतेला
विनाश काली फिरते बुद्धि येइ प्रत्ययाला

पद ६४

असो ! तुडविली होळी असुरे मंदिरांत शिरती
मूर्ति भंगिल्या असंख्य त्यांनीं, हर्षित मनि होती
गृहांत शिरुनी स्त्रिया कितीतरि भ्रष्टविल्या त्यांनी
पांचावरही धारण बसली, गेले किति पळुनि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................... वि: ...... ........
क्रमांक .................... नों: दि: ............

पद ६५

मध्यभागि या नगराच्या हो होळि पाटलाची
पेटवावया जमलो आम्ही, भीति न मरणाची
रजाकार ते धांवुनि आले आणाया विघ्न
गोळ्यामागुनि गोळ्या सुटल्या दोघांच्या कडुन
त्यांत आमुचा एक बळी नी दुसरा यवनांचा
पडले दोघे भूमीवरती, बंद होय वाचा

दिंडी ६६

कळे वार्ता धारुरी खून झाले
चौकशीतें अधिकारि शीघ्र आले
धाक पडला रजपुत पुढाऱ्यांना
हर्ष परि तो जाहला मुसलमाना

पण :-

ओवी ६७

साम्राज्य माजतां अंधाराचें
कृष्ण कृत्यें दिसती न त्याचे
ऐशा समयीं प्रकाशाची
किरणें दिसती निश्चित

दुःखांत सुख एवढेंच कीं,-

आर्या ६८

पूज्य विनायक विद्यालंकाराचेंच साह्य बहु झालें
कवडी न एक घेतां, सत्कार्यी धावुनी पहा आलें

केस सेशन कमिट झाली. पुष्कळ रजपुतांना अटक झाली. आमचे चरित्र नायक श्री. बनसीधर मात्र गुप्त मार्गानें मानवत रोडहून मोठ्या शिताफीनें हैद्राबादी आले. ( या वेळी ने. सुभाषचंद्राच्या साहसाची

आठवण होते. पण तशी तुलना केल्यास कोणास धाष्टर्याचें वाटेल म्हणून येवढेंच लिहून पुढें चलतो)

त्यांना पोलिसांनी गांठले. पण एका मित्राच्या साह्यानें व आईच्या आशिर्वादानें ते वांचलें. नंतर हैद्राबाद सोडून इंग्रजी इलाखा गांठला. तेथेंहि पोलीस आले. पण त्यांच्या हातावर तेथेंहि तुरी देऊन तें गोव्यांत आले. तेथें एक वर्ष काढले. औरंगाबादेत कांही लोक सुटले व कांहींना शिक्षा झाल्या. त्याचें अपिल होऊन कांही लोक सुटले.

बनसीधर सारखे लोकहि पळून गेलेले मोकळे झाले. बनसीनें पळून जाण्याचा विचार केला. पण अेन प्रसंगी जो प्रकार घडला तो असा.

बनसीधरजी सांगतात–

-----

# प्रसंग ६ वा

अेके दिवशी मला भयंकर दमा उठला जवळ जवळ तीन आठवडे मी मृतप्रायच होतो. धारुरला तार करण्याकरतां हॉटेलच्या मालकानी मला माझा पत्ता विचारला. पण मी म्हणालो 'उपयोग काय' कोणी तिकडून येण्यापूर्वीच माझें प्राणोत्क्रमण होईल. मी क्षणाचा सोबती आहे.

तिकडच्या कायद्याप्रमाणें माझ्या आप्तेष्टांची परवानगीही मागविण्यांत आली.

आर्या ६९

**क्लेश मला सहवेना झोंप तशी टाकुनी मला गेली**
**यावें मरण म्हणूनी । केली युक्ती न साध्य तो झाली**

भू. प्र. ७०

**उठावें बसावें मधूनी पथांत**
**तसा आक्रमी मार्ग थोडा, श्रमांत**
**दहा पावलें टाकितां, तास गेला**
**श्रमानें अती गांठले फाटकाला**

दवाखान्यांत जाण्याकरितां कसा तरी फाटकाजवळ आलो. बग्गी येईल तींत बसून दवाखाना गाठावा व कांही उपचार करावे.

अशक्तता वाढलेली, दम्याचा वाढता जोर अशा स्थितींत काय करावे? कांही सुचेना. मदतीची तर अपेक्षाच नव्हती पण इतक्यांत काय दैवी चमत्कार झाला पहा.

पद ७१

**शुभ्र कौपिनी अंगावरती दाढी शुभ्र तशी**
**गौरवर्ण तो बघतां लाजे शुभ्र नभि तो शशी**
**शांत मनोहर तेज मुखाचें पाहुनिया मजला**
**देवदूत हा भूमीवर जणुं स्वर्गाहुनि आला**

नयनरम्य तें सरल नासिका हास्य मुखीं विलसे
प्रणाम केला सादर तरुणा, मला न परि उमजें

पृथ्वी ७२

असे तरुण कोण हा ? किति सतेज याचें मुख
कशास समयीं अशा मजपुढें उभा सन्मुख ?
असेल, मज भासलें खचित हा जगन्नायक
परी, न, पतिता दिसे, प्रभु कधीं मला ठाऊक

तो तरुण कांही बोलला नाही. पण त्यानें अेक गाडी आणविली व मला गाडींत धरून नेऊन बसविलें बग्गीवाल्यास गाडी सिव्हिल सर्जनच्या बंगल्यावर घेऊन जाण्यास सांगितलें.

पद ७३

कृष्णपक्षिची भयाण रात्री होती त्या दिवशीं
मध्यरात्रिचा समयचि होता, निद्रित पशुपक्षी
भयद शांतता उग्ररुप निज दावित ती अपुलें
धडकी भरली हृदयीं माझ्या, धैर्य गलित झालें
पहारेकरि ते जागृत दिसलें कर्तव्यीं रत तें
कुणी न आम्हां आडविलें तिळ, नवल मला गमले
हात धरोनी हळूच मजला तरुण मार्ग दावी
सर्जन जेथें निजला तेथें त्वरित मला नेई

त्या तरुणाने दारावर थाप दिली व एक हांक देताच सिव्हिल सर्जननें संतापानें दार उघडले.

दिंडी ७४

हांक देतां उघडलें तदा द्वार
क्रोध आला उठवितां तया फार

ग्रंथ ... ठा... स्वकमत.
अनुक्रम ... वि: ...
... नों: दि: ...

पण :-

**तरुण –मूर्ती बघतांच शांत झाला**
**सर्जनानें साष्टांग तया केला**

तरुणाने माझी सर्व हकिगत त्यास सांगितली तेंव्हा मुकाट्याने एका कागदावर एक prescription ( औषधी योजना ) लिहून आंत जाऊन एक डोस मला पाजला व या कागदावर लिहिलेलें औषध त्यास पाजण्यास सांगून दार बंद केलें.

इकडे त्या तरुणाने मला हॉटेलमध्यें आणलें, स्टोव्ह पेटविला, ऊन पाण्यानें माझे पाय भांड्यांत घालून शेकले, औषध दिलें.

थोड्या वेळाने कॉफीचा एक कप मला पाजून एक गोळी मला गिळण्यास सांगितली.

मला दोन तीन जुलाब झाले. दमा पार पळून गेला. मला चांगली झोंप लागली. सकाळी उठून या गृहस्थाचा मी शोध करूं लागलो पण पत्ता नाहीं. म्हणून त्याच्या शोधार्थ मी सर्जनच्या बंगल्यावर गेलो. सर्जनने मला पहातांच विचारले " बाळा! तुझी प्रकृती कशी आहे ? काल तुझ्याबरोबर आलेला गृहस्थ कोठें आहे, तो कोठें राहतो? मला त्याचें दर्शन करविशील का ?

हे ऐकतांच मी थक्कच झालो. हे पहातांच सर्जन म्हणाला अरे वेड्या तूं धन्य आहेस तुझ्यामुळे मला त्या देवाचें दर्शन झालें.

झालें. मला पश्चात्ताप झाला व सहज हे उद्गार माझ्या मुखांतून बाहेर आले.

अभंग भैरवी ७५

**पतित मी भारी ।। खचित रे ! देवा !**
**जन्मुनीया जगती घडली न सेवा ।। १ ।।**
**कशासाठीं मातें जीवन दिधलें**
**फुकट हा गेला जन्म वाया ।। २ ।।**
**नाहीं केला स्वार्थ ना नाही परमार्थ**
**शिणविली माय व्यर्थ देवा ।। २ ।।**

तरुणाचा वेष घेसी मजसाठीं

मजसाठी देवा शिणविली काया ॥ ४ ॥

प्राण माझें जातां ओस काय जग ?

पडलें हें असतें सांग देवा ॥ ५ ॥

बनसीधरला अत्यंत पश्चात्ताप झाला. डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहूं लागले. शरीर कंपित झाले व तो म्हणाला–

श्लोक ७६

'जन्मापासुनि ना दिलें सुख कुणा
ना कांहि संपादिलें
नाहीं स्वार्थ परार्थही मिळविला
कोणा न संतोषिलें
विद्याकाव्य कला अपूर्ण शिकलो
ना मान कोठें मिळे
ऐसें जीवित कां दिलें मजसि हें
देवा मुळी ना कळे

शा. वि. ७७

जन्मीं येउनि मीं खरें शिणविली माता मदीय वृथा
देवा आळविलें मुळीं न कधिही, ना ऐकल्या सत्कथा
काया वाङ्मधुरें मुळीं उपकृती केली न कोणावरी
ऐसें व्यर्थ जिणें धरूनि जगलो, प्रेतापरी भूवरी

मला त्यानंतर दहा वर्षेपर्यंत दमा कसा तो माहीत नाही. धारूरला त्या नंतर मी सुखाने कालक्रमणा करूं लागलो.

---

# विठ्ठलाश्रम

## (मातुश्रींचें स्मारक)

मागे कथन केल्याप्रमाणें बनसीधरची आई निवर्तली तेव्हांपासून बनसीधर उद्वीग्नच राहिले. पदोपदी त्यानी आत्महत्त्या करण्याचे प्रयत्न केले. माता जातांच लोक शवाच्या यात्रेची तयारी करण्यात गुंग असतां इकडे बनसीधरनें काय धाडस केले ते पहा.

पद ७८

**आप्त इष्ट ते रडूं लागलें झाला आक्रांत**
**शव नेण्याची तयारि करिती, शोका ना अंत**

अशी संधी साधून बनसीधरजी उठले व–

दिंडी ७९

**चिरेबंदी न्हाणींत होति भिंत**
**धडक द्याया धावला तत्क्षणांत**
**परी त्याचें दुर्दैव आड आले**
**पूज्य मामा आडवे तदा आले**

त्या वेळी बनसीधरला फार वाईट वाटले व ते मनाशी म्हणूं लागलें.

पद मालकंस ८०

**प्रयत्न करिशी अगणित पाप्या !**
**नाश स्वतःचा आत्मघातक्या**
**विफलित होतीं परि ते सारें**
**भोग अजूनी तुझा न सरला**

**मरणाची ही ठरली वेळां**
**प्रयत्न होती फोल अवेळा**
**आत्मघात हा पाप वाढवी**
**कळते कां ना मूर्खा तुजला ?**

आई वारून पांच दिवस झाले. सहावे दिवशी रात्री १२ वाजतां जिकडे तिकडे सामसूम झाली होती. सर्व घरांतील माणसें गाढ झोपेंत घोरत होते अशी संधी पाहून .. ...

———

# प्रसंग ७ वा

## आत्महत्या प्रयत्न

बनसीधर तळ्याकडे जाण्यास निघाले. उंचावर चढून तळ्यांत उडी मारावी पण त्यास पोहतां येत होतें. म्हणून कदाचित मरणाच्या भीतीनें पोहून वर येऊं म्हणून त्यानें मोठमोठे दगड कंबरेस गुंडाळले व तो उडी मारणार इतक्यांत:—

दिंडी ८१

**हाय बनसी ! करतोस कृत्य काय ?**
**असें वदुनी ओढिला मदिय काय**
**' मदिय मामा धावूनि ' कळुनि आलें**
**' बेत फसला मग ' विफल सर्व झालें**

मला तेथून मामानें घरी आणलें व कडक नजर मजवर ठेविली. दिवसा देखील मला घरांतून जाण्याची परवानगी नसे. मी फार कंटाळलो व रडूं लागलो. कधी कधीं भयंकर संतापानें मी मामांना वेडेवाकडे बोललो. तेव्हां शांत वेळ पाहून मला मामांनी चार उपदेशाच्या गोष्टी कधीं प्रेमानें तर कधी रागानें मला सांगितल्या. तो उपदेश असा—

०० ०० ००

## मामांचा उपदेश

पद ८२

**मामा :— भला जन्म हा तुला लाभला नरदेहीं दैवें**
**आत्मघात कां करणें रुचते, मला न हेंच कळें**
**दुःखें असतीं संसारीं या अगणित शंका ना**
**जवापरी तें सौख्य सांपडे, संत बोलती ना ?**

पद ८३

दुःख पाहतां पळूनि जाणे, आत्मघात करणें
भ्याडपणा हा वाटे मजला, ध्यानीं हें धरणें

पद ८४

तुकाराम तो संसारांतचि रामनाम घेई
स्वार्थ करूनी परमार्थाचा लाभ सदा घेई
तोंड संकटा वीर देति ते धन्य मरण त्यांचें
छीः थूः होते जगीं मरण बा ! आत्मघातक्याचे

पद ८५

होळकराची सून अहल्या काय सती गेली ?
जिवंत राहुनि देवमंदिरे तिनें बांधियेली
अनाथ सदनें घाट बांधिलें विहिरी रस्त्यांनी
धन्य अहिल्या म्हणुनि गायिली कीर्ति कितीकांनी

पद ८६

'कोणी मरतां संगें जाणें' आत्मघात म्हणती
पाप तयाच्या पदरीं येतें, उलट हीच नीति
माता मरतां प्राण आपुला मूर्खपणें देणे
शुर कुणी कां म्हणेल ऐशा बालिश कृत्यानें

०० ०० ००

प्रेम तुझें जर मातेवर बा ! पुण्य कर्म करणें
स्मारक कांहीं मातेचें तूं जन्मुनिया करणें

कारण बाळा ! बनसी !

जें जें सत्कर्म तूं करशील तेवढेच तुझ्याबरोबर येईल. आईचे पुण्याईनी तूं सुखी होशील पण तिनें केलेलें सत्कर्म तिच्याच बरोबर जाईल. तुझा व तिचा अर्थाअर्थी काय संबंध? मायेचें हें आवरण आहे दुसरें काय?

पद ८७

बाळा ! :–सुत सुता कांता तुझि नही ॥
कांता द्वारीं धन ते सदनीं
सुत मित्रादिक येति स्मशानी
देह जाइ हा अग्नि भक्षणीं
जीव एकला अंती जाई ॥ १ ॥
जननि कुणाची, पिता कुणाचा
एक न कोणी तो कामाचा
कर्म आपुलें ेई साथी
ध्यानी धरिबा गोष्टहि साधी ॥ २ ॥
नाशवंत हा देह सदाचा
शाश्वत आत्मा तो नित्याचा
देहपात हा होता अमुचा
उडूनि आत्मा राघू जाई ॥ ६ ॥

म्हणून–

श्लोक ८८

उभारी मुला भव्यशी धर्मशाळा
विहीरी खणीं शांत पांथस्थ आल्या

**तिथें वृक्ष लावी, करी गर्द छाया**
**पशूंची जनांची तृषा शांतवाया**

हा उपदेश बनसींसारख्या सज्जन व आधीच दुःखानें पोळलेल्या बालकास पटला. नंतर सर्वांनी मिळून एक योग्यशी जागा धर्मशाळा विहीर, व शेती करितां पसंत केली.

ती जागा अशीं--

पद्य ८९

**चढण लागते जेथुन वरती यावयास पांथा**
**डोंगर उतरुनि थकुनि जाई त्यावरूनी येतां**
**केंद्र असें हें निश्चित केलें साऱ्या सूज्ञांनीं**
**व्हावी येथें विहीर, छाया, अन्नछत्र तीन्हीं**

लागलीच-- पद ९०

**मग ठरलें अन्नसत्र तें सांग घडावें, जागा बांधावी**
**यती तापसी घांवयाही सोय तिथें व्हावी**

दिंडी ९१

**धर्मशाळा बांधिली भव्य तेथें**
**वृक्षवेली लाविल्या पहा तेथें**
**शेत केलें उत्पन्न कांहीं व्हाया**
**अनाथांना जल अन्न द्यावयाला**

पण ती जागा आधीं कशी होती ?

उकिरड्याचेंहि कधीतरी दैन्य फिटतेंच त्याप्रमाणें या जागेचाही भाग्यकाल आलाच.

कटाव ९२

उंच सखल तो पहाड होता । निवडुंगाच्या कांटेरीचा
गगनभेदि तै होती झाडी ।। हिंस्र पशू तें फिरती मधुनी
कितीक पडली, गुरें निर्वली ।। सिंहाच्या ती भक्ष्यस्थानी ?
चोरांचाहि होता अड्डा ।। द्रव्य वाटणी करावयाचा ।।
नाममात्र ती चौकी होती । चैन कराया सरकारची ।
आम्रवृक्ष ते ठायीं ठायीं ।। लावायाची झाली घाई ।।
जागा होती सरकाराची । विनंति केली ती द्यायाची ।।
चौदा एकर जमिन मिळाली । भाग्यश्री ती उदया आली ।।
दुर्गंध लवण तें कुणी टाकलें । मध्यंतरिं तें कार्य नासलें ।।
सत्कर्मी विघ्न आम्हाला आलें । यवनांनी एक अर्ज केला ।

म. माला ९३

जागा असे आमुची ही पवित्रा
इथें नित्य फात्या घडे आमुचा
साक्षी पुरावे हवें तें कशाला ?
कधीं कां मृषा हो वंदू या वचा ?
कुत्रीं कुलंगी इथें आणवूनी
आम्हां त्रास देतील बन्सी किती !
धर्मी निधर्मी अम्हां नाडवीती
बलानें आम्हाला सदा गांजिती
आधींच तारे त्यांत गेले वारे !

श्लोक ९४

आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला
झाला तयांत मग वृश्चिक दंश त्याला ।
चेष्टा करी बसुनि माकड तेवि झाले
आज्ञा करी नृप वरी तंव काय बोले ?

वरून हुकूम आला.--

श्लोक ९५

करीं घ्या, तयाची म्हणीं ती जमीन
तिथें नित्य व्हावे नमाजादि कर्म
कुणी हिंदु येई जरी आड त्यास
तया बांधुनी टाकणें, हो, तरूस

अधिकारी जमीन ताब्यांत घेण्यास आला पण लक्ष्मीचे सामर्थ्यानी त्याच्या तोंडाला पाणी सुटले, शिवाय आईचा आशिर्वाद बनसीधरला पूर्ण असल्यामुळे अधिकारीहि घावरून गेला कारण आईचे सामर्थ्यच असें आहे.

स्रग्धरा ९६

काका मामा नि बंधू इतर जन तसें
सर्व साथी सुखाचे
येतां वेला कठीणा कुणि न पुसत हो
पांगती आप्त साचे
निष्काम प्रेम जीचें बघुनि जगति ये
न्यूनताही पित्याला
आईचा शीर्षि ज्याच्या अभयकर सदा
कांपतो काळ त्याला

ग्रंथ (४७) संग्रहालय, ठा
अनुक्रम.............................. वि:
शिवाय धनाची आशा दाखवितांच--
.............................. नों: दि:

भु. प्र. श्लोक ९७

**धनाची तया दावितां लेश आशा**

**पहा हो सुटे त्यास पाणी मुखाला**

**मृदुंगा मुखीं लावितां लेप बोलें**

**तसा लांच देतांच हर्षात डोले**

त्याने निकाल दिला—

मैनें मायना मौका किया! मायनेसें मालूम हुवा कें बनसीधर पंडत की बात बिलकुल सही है। उन्होंनें कोई ज्यादती नही की। वलके आने-जानेवाले मुसाफिर, साधू फकिरों के लिये ठैरनेके लिये अच्छा मुक्काम बनाया। जानवर भी पानी पीकर यहां दरख्तके नीचे आरामसे सोते है। मुझे ये मुक्काम देखकर बेहुद खुषी हुवी। लिहाजा ये मुकदमा काबिल खारिज है। शिकायत जो की गयी बिलकुल बे बुनयाद है।

अभंग ९८ भैरवी

**फार बरें झाले ।। देवदया झाली**

**उत्साहातें आतां सीमा नुरली ।। १ ।।**

**धर्मशाळा झाली ।। गर्द छाया झाली**

**आनंदे वसती गुरें ढोरें ।। २ ।।**

**वळविले पाणी बाहेरून तेव्हां**

**बहरली शेती वेगें अमुची**

**यांत माझी कांहीं प्रौढि मुळि नाही**

**आईचाच असे सारा आशी**

श्लोक ९९

यावें विघ्न, न, ते कधीहि म्हणुनी विश्वस्त तै नेमिलें
पत्री लेखनि मी मुळी स्थळ जरा लोभास ना ठेविलें
झालें हातुनि हें परार्थ सगळें, केलें, न, मी किंचित
आशीर्वाद मला असे जननिचा हे सांगतो निश्चित.

## ....मागणें....

अभंग १०० भैरवी

घडो संत सेवा नित्य मज हाती
अशुभ न येवो कधि मम चित्ती
काया ही पडावी संतांच्या चरणीं
सर्व सुखी व्हावें विनंती चरणी
निरामय होवो भारत हा देश
सस्यमय होवो माझा हा देश
आईच्या चरणीं लवो हें मस्तक
देवदया होवो याचना ही

REFBK-0010324

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........
क्रमांक ........

सम्मान

९०३२८

## ....श्री. देवांची प्रकाशनें....

| | मूल्य रु. नये पैसे |
|---|---|
| देवकन्या पुष्प १ ले ( शिल्लक नाही ) | १--२५ |
| श्री. संत भटजीबापू (चरित्र) पुष्प २ रें | ०--७५ |
| प्रतिज्ञा पूर्ति ( खंड काव्य ) पुष्प ३ रे | १--२५ |
| विचार लहरी (लेख संग्रह) पुष्प ४ थें | २--०० |
| आईचा आशीर्वाद पुष्प ५ वे | ०--७५ |

## ....आगामी प्रकाशनें....

★ तेजस्वी तारे

★ भाव तरंग

★ माधव गुणगान

★ बुद्धदर्शन ( २ भागांत )

★ विचार धारा ( लेखसंग्रह )

## मिळण्याची ठिकाणें:—

श्री. श्री. रा. देव, ' देवनिवास ' धाराशिव, उस्मानाबाद.

हिंदुस्थान साहित्य, ३०९ मोतीबाग, शनिवार पेठ, पुणें २.

: मुद्रक :

**व. वि. आपटे,** बी. कॉम्.

हिंदुस्थान मुद्रणालय, ८६५ सदाशिव पेठ,

पुणें २.

★

मार्गशीर्ष कृष्ण ११ शके १८८१

दि. २६-१२-१९५९

सर्व हक्क लेखकाधिन

★

: प्रकाशक :

**श्री. रा. देव**

' देवनिवास ' धाराशिव

उस्मानाबाद